(महाराष्ट्र शासन)

# उपविभागीय अधिकारी कार्यालय,भोकरदन

जुनी प्रशासकीय इमारत, जालना रोड भोकरदन

दुरध्वनी क्रमांक: 02485-244600 फॅक्स क्रमांक: 02485-244600

Email: sdmbhokardan103@gmail.com

**जा.क्र.2016/उविअ/भूसंपादन/सिआर-03/2016** **दिनांक:-29.11.2016**

## प्रारंभिक अधिसुचना

**भूमिसंपादन, पुनर्वसन, पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 अन्वये कलम 11(1) खालील अधिसुचना**

ज्या अर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,2013 (30 चा 2013) च्या कलम 3 च्या खंड (इ) च्या परंतूका व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसुचना, महसुल व वनविभाग क्र.संकीर्ण 11/2014/प्र.क्र.77/अ-2, दि.19 जानेवारी 2015 (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसुचना असा करण्यात आला आहे.) याव्दारे असे अधिसुचीत केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (झेडअे) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हयातील 500 हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याचा संबंधात अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचीत शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या जालना जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशिलावर वर्णन केलेली जमीन (यात यापुढे ज्याचा निर्देश “उक्त जमीन” असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्या निर्देश उक्त “सार्वजनिक प्रयोजन” असा करण्यात आला आहे)आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोटकलम (1) च्या तरतूदीन्वये याव्दारे असे अधिसुचीत करण्यात येते की; उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी प्रस्तावित भूमीसंपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्या अर्थी कलम 43 च्या पोट कलम (1) अन्वये पुनवर्सन व पुनर्स्थापना या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे.

त्या अर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोटकलम 4 अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसुचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतूदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतूदीमध्ये बुद्धीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोटकलम (5) नुसार जिल्हाधिकारी भूसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, 2014 (यात यापुढे ज्यांचा निर्देश “उक्त नियम” असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम 10 च्या उपनियम (3) व्दारे विहीत केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्यावती करणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषीत करण्यात येत आहे.

आणि ज्या अर्थी उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (छ) अन्वये, समूचीत शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनिमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, भोकरदन यांना पदनिर्देशीत करीत आहे.

**अनुसूची 1**

**जमिनीचे वर्णन**

**गाव: सिरसगांव मंडप तालुका भोकरदन जि.जालना**

| अ.क्र | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| 1. | 202 | 0.31 हे.आर |
| 2. | 202 | 0.29 हे.आर |
| 3. | 203 | 0.33हे.आर |
| 4. | 203 | 0.47 हे.आर |
| 5. | 203 | 0.43 हे.आर |
| 6. | 203 | 0.12 हे.आर |
| **एकूण क्षेत्र** | | **1.95 हे.आर** |

**अनुसूची -2**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव : पाझर तलाव क्र.12 मौ.सिरसगाव मंडप ता.भोकरदन जि.जालना**

**प्रकल्प कार्याचे वर्णन : मौ.सिरसगाव मंडप ता.भोकरदन जि.जालना येथील पाझर तलाव क्र.12 च्या संपादनाबाबत**

**समाजाला मिळणारे लाभ:-** या प्रकल्पामूळे मौ.सिरसगांव मंडप ता.भोकरदन येथील जमीन ओलीतीखाली येणार नाही. पाझर तलाव क्रं.12 मूळे त्या लाभक्षेत्रातील जमिनीची पाणीपातळीत भरपूर प्रमाणात वाढ होणार आहे. तसेच गावाच्या पिण्याच्या पाण्याचा, जनावराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे. या पाझर तलावाच्या कामामूळे बेरोजगारांना रोजगाराची संधी मिळणार आहे. तसेच संपादन क्षेत्रालगतची जमीन ओलीती होणार असून प्राप्त होणाऱ्या उत्पनात लक्षणीय वाढ होणार आहे व पर्यायाने खेडयातील जीवनमानात (STANDARD OF LIVING) सुधारणा होणार आहे.

**अनुसूची -3**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे:-** सदरचा प्रकल्प हा सिंचन क्षेत्रातील जमीन अधिकाअधिक फायदेशीर उत्पन्न देणारी व लाभदायक व्हावी यासाठी पाझर तलाव क्र.12 चे संपादन करण्यात आलेले आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम व सखोल शेतजमिनीवर असून त्यास शेतकऱ्यांची संमती आहे. यामध्ये कोणतीही वस्ती अथवा गावठाण बाधीत होत नसल्यामूळे अथवा कोणतीही व्यक्ती विस्थापित होत नसल्यामूळे पुर्नवसन करण्याची आवश्यकता नाही.

## अनुसूची - 4
## समाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश

नवीन भूसंपादन कायदा 2013 कलम (6) मध्ये अन्वये सामाजिक परिणाम निर्धारणातून सूट आहे.

## अनुसूची -5
## नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल

अ) सदरचा प्रकल्प हा सिंचन क्षेत्रातील जमीन अधिकाअधिक फायेदशिर उत्पन्न देणारी व लाभदायक व्हावी यासाठी पाझर तलाव क्र.12 चे संपादन करण्यात आलेले आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम व सखोल शेतजमिनीवर असून त्यास शेतकऱ्यांची संमती आहे. यामध्ये कोणतीही वस्ती अथवा गावठाणबाधीत होत नसल्यामूळे अथवा कोणतीही व्यक्ती विस्थापित होत नसल्यामूळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

सबब प्रशासक नियुक्तीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता **:-निरंक**

क) ज्या अधिसुचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती

करण्यात आली आहे त्या अधिसुचनेचा तपशिल **:-निरंक**

**टिप:-** उक्त जमिनीच्या आराखडयाचे उपविभागीय अधिकारी कार्यालय भोकरदन यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**दिनांक :- 29/11/2016**

**ठिकाण :- उपविभागीय अधिकारी कार्यालय भोकरदन**

(हरिचंद्र गवळी)
**उपविभागीय अधिकारी तथा**
**भूसंपादन अधिकारी भोकरदन**

**<u>- भाग ख -</u>**

**ग्रामसभेच्या ठरावाचा नमुना**

**आम्ही खालील सही करणार सिरसगाव मंडप ग्रामसभेचे सदस्य जालना जिल्हयामधील भोकरदन तहसिल/तालुक्यातील सिरसगांव मंडप ग्रामपंचायती हद्दीतील**

यावद्दारे असे नमूद करतो की, पुढील प्रमाणे हे उपविभागीय अधिकारी भोकरदन च्या प्रशासनाने व अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीवर आधारीत आहे. जर ती माहिती अपूर्ण किंवा चुकीची आढळून आली किंवा जर कोणतीही संमतीही, धमकी देऊन लबाडीने किंवा चुकीची माहिती देऊन प्राप्त केलेली असेल तर अशी कोणतीही संमती रद्दबात ठरेल.

त्या आधारे ही ग्रामसभा याव्दारे असे प्रमाणीत करते की, प्रस्तावित पाझर तलाव क्र.10 मौ.सिरसगाव मंडप ता.भोकरदन जि.जालना प्रकल्पाला संमती आहे.

- **1.07 हे.आर इतक्या** खाजगी जमिनीचे संपादन
- निरंक हेक्टर इतक्या शासकीय जमिनीचे प्रकल्पासाठी हस्तांतरण
- निरंक हेक्टर इतक्या वनजमिनीचे प्रकल्पासाठी हस्तांतरण

भरपाई, पुनर्वसन व पुनर्स्थाविषयक लाभ आणि मागणी कर्त्या संस्थेने नाव नमुद करावे. मान्य केलेली सामाजिक परिणाम सौमीकरण उपाय योजनांच्या अटी व शर्ती सोबत जोडल्या आहेत.

ग्रामसभा असे ही नमूद करते की, कोणतीही संमती देणे हे केवळ आपले रहिवासी करत असलेल्या वनजमिनीवर व असलेल्या त्यांच्या मालकी हक्क ते ज्यांचा उपभोग घेतात त्या सर्व प्रकारच्या गौण वनोत्पादनावरील त्यांच्या मालकी हक्क आणि सामुहीक वनांचे रक्षण व व्यवस्थापण करण्याचा असलेला त्यांच्या हक्क यासह वने आणि वन जमीनीयावर वैयक्तीक हक्क व सामुहीक हक्क असणाऱ्या आपल्या सर्व् रहिवाशांवर अवलंबून असेल.

(टिपः- ग्राम सभेने स्वतंत्रपणे प्रमाण्ीत करावयाचे आहे.ग्रामसभा सदस्यांची दिनांकीत स्वाक्षरी/अंगठयाचा ठसा)

**<u>नमुन्या तीन</u>**
**(नियम 9(6) पहा)**

**भाग क**

**पूर्व लेखी संमतीचा किंवा प्रतिज्ञापत्राचा नमुना**

**अ.क्र संबंधीत व्यक्तीचा तपशिल-**

1. ज्याच्या नावावर जमिनीची नोंद आहे अशा व्यक्तीचे नावः-
2. पती/आईचे नावः-
3. वडील/आईचे नावः-
4. पत्ताः-
5. गाव/वस्ती :- सिरसगाव मंडप
6. ग्रामपंचायत/नगरपालिका/वसाहत :- सिरसगाव मंडप
7. तहसिल/तालुकाः- भोकरदन
8. जिल्हा :- जालना
9. कुटूंबातील इतर सदस्यांचे नाव व वय

   (अवलंबीत मुले व प्रौढ व्यक्तीसह)
10. मालकीच्या जमिनीची व्याप्ती :-
11. विवादास्पद जमिनीची कोणत्याही असल्यास :-
12. पट्टा/भाडेपट्टा/इनामपत्रे/कोणतीही असल्यास :-
13. कुळवहीवाट सह इतर कोणतेही हक्क असल्यास :-
14. शासन संपादन करीत असलेल्या माझ्या :-

जमिनीच्या बाबतीत मी पुढीलप्रमाणे असे नमूद करतो की, मी या संमती पत्राचा मजकूर वाचला आहे, समजून घेतला असून तो मला मराठी भाषेत समजावून सांगीतला आहे व माझी या संपादनास संमती आहे/संमती नाही.

बाधित कुटुंबाची स्वाक्षरी/अंगठा व दिनांक